# केंद्र पुरस्कृत योजना

## राष्ट्रीय पशुधन अभियान

नाविन्यपुर्ण योजना व विस्तार उप-अभियान : मेंढ्या, शेळी, वराह आणि चारा आणि चारा क्षेत्र, विस्तार उपक्रम, पशुधन विमा आणि नवोपक्रमाशी संबंधित संशोधन आणि विकास करणाऱ्या संस्था, विद्यापीठे, संस्थांना प्रोत्साहन देणे हे उप-मिशनचे उद्दिष्ट आहे.

- केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत खालील प्रमाणे विविध 3 उप-अभियानांचा समावेश केलेला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | **योजनेचे नाव** | : | **पशुधन आणि कुक्कुट प्रजाती विकास उप-अभियान: या उप-अभियानातून उद्योजकता विकासावर आणि कुक्कुट, मेंढ्या, शेळी आणि वराह यांच्या प्रजाती सुधारण्यावर भर देण्यात आलेला आहे.** |
| **अ** | **उपयोजना** | | **ग्रामीण शेळी मेंढी पालनातुन प्रजाती विकासाद्वारे उद्योजगता विकास** |
| | लाभार्थी प्राधान्य | : | वैयक्तिक, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था, सामुहिक दायित्व गट व नियम ८ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी, |
| | लाभ | : | **500 शेळया/ मेंढ्या + 25 बोकड / नर मेंढे गटाची स्थापना करणे (उर्वरीत 50 टक्के बँकेचे कर्ज अथवा लाभार्थी स्वहिस्सा) सर्व प्रवर्गासाठी, 50 टक्के भांडवली अनुदान रु. 50.00 लक्ष (दोन समान हप्त्यांमध्ये), छोटे गट (400+20, 300+15, 200+10, 100+5) नुसार अनुषंगिक अनुदान ( रु. ४० लाख, ३० लाख, २० लाख, १० लाख) उपलब्ध** सर्व प्रवर्गांसाठी ५०% अनुदान, |
| **ब** | **उपयोजना** | : | **ग्रामीण कुक्कुट पालनातुन प्रजाती विकासाद्वारे उद्योजगता विकास** |
| | लाभार्थी प्राधान्य | : | वैयक्तिक, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था, सामुहिक दायित्व गट व नियम ८ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी, |
| | लाभ | : | **कमीत कमी 1,000 अंड्यावरील (लो इनपुट तंत्रज्ञान) कुक्कुट पक्ष्यांचे संगोपन व अंडी उबवणी केंद्राची स्थापना, एक वेळ 50 टक्के भांडवली अनुदान अधीकतम मर्यादा रु. 25.00 लक्ष प्रती युनिट (दोन समान हप्त्यांमध्ये) (उर्वरीत 50 टक्के बँकेचे कर्ज अथवा लाभार्थी स्वहिस्सा)**सर्व प्रवर्गांसाठी ५०% अनुदान, |
| **क** | **उपयोजना** | : | **वराहपालनद्वारे उद्योजकता विकास** |
| | लाभार्थी प्राधान्य | : | वैयक्तिक, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था, सामुहिक दायित्व गट व नियम ८ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी, |
| | लाभ | : | **सर्व प्रवर्गांसाठी -100 मादी + 10 नर वराह गटाची स्थापना करणे, एक वेळ 50 टक्के भांडवली अनुदान रु. 30 लक्ष, छोटे गट 50 मादी+5 नर नुसार रु. 15.00 लक्ष अनुदान (उर्वरीत 50 टक्के बँके चे कर्ज अथवा लाभार्थी स्वहिस्सा)**सर्व प्रवर्गांसाठी ५०% अनुदान, |
| | अर्ज कसा करावा | : | लाभार्थी अर्ज व निवड प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने https://nlm.udyamimitra.inया पोर्टल वर |

| | | | |
|---|---|---|---|
| **२** | **योजनेचे नाव** | : | **पशुखाद्य व वैरणउप-अभियान** या उप- अभियानातून चारा बियाणे साखळी मजबूत करण्याकरिता उत्पादनासाठी आवश्यक प्रमाणित चारा बियाणांची उपलब्धता सुधारण्यासाठी आणि चारा ब्लॉक/हे बेलिंग/सायलेज युनिट्सच्या स्थापनेसाठी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. |
| **क** | **उपयोजना** | : | **पशुखाद्य व वैरण उद्योजकता विकास** |
| | लाभार्थी प्राधान्य | : | वैयक्तिक, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था, सामुहिक दायित्व गट व नियम ८ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी, |
| | लाभ | : | **मुरघासबेलर, वैरणीच्या विटा आणि टी.एम.आर निर्मीती करीता दोन टप्प्यांमध्ये अनुदान सर्व प्रवर्गांसाठी, प्रकल्पकिंमतीच्या ५० टक्के रु. ५०.०० लक्ष पर्यंत**सर्व प्रवर्गांसाठी ५०% अनुदान, |
| | अर्ज कसा करावा | : | लाभार्थी अर्ज व निवड प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने https://nlm.udyamimitra.in या पोर्टल वर |

## जिल्हा राजस्व निधी योजना

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | **योजनेचे नाव** | : | **५० % अनुदानावर विद्युतचलित कडबकूटटी यंत्र वाटप योजना** |
| | लाभार्थी प्राधान्य | : | अत्यल्प भूधारक, अल्पभूधारक,सुशिक्षित बेरोजगार, महिला बचत गट किंवा उपरोक्त तीन मधील वैयक्तिक महिला लाभार्थी |
| | लाभ | : | **२ एच पी विद्युतचलित कडबकूटटी यंत्र ५० टक्के अनुदान रु. १२,५००/-पर्यंत** सर्व प्रवर्गांसाठी ५०% अनुदान, |
| | अर्ज कसा करावा | : | लाभार्थी अर्ज व निवड प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने |
| **१** | **योजनेचे नाव** | : | **५० % अनुदानावर सुधारित जातीचा बोकड वाटप योजना** |
| | लाभार्थी प्राधान्य | : | अत्यल्प भूधारक, अल्पभूधारक,सुशिक्षित बेरोजगार, महिला बचत गट किंवा उपरोक्त तीन मधील वैयक्तिक महिला लाभार्थी |
| | लाभ | : | **सुधारित जातीचा बोकड वाटप व विमा ५० टक्के अनुदान रु. २९००/-पर्यंत** सर्व प्रवर्गांसाठी ५०% अनुदान, |
| | अर्ज कसा करावा | : | लाभार्थी अर्ज व निवड प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने |